पिण्याच्या पाण्याच्या पुरवठा करण्यासाठी भाडयाने घेण्यात येणा-या खाजगी टँकर्स व ट्रक्सच्या दराबाबत.

# महाराष्ट्र शासन
## पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग
## शासन निर्णय क्रमांकः टंचाई २०१८/प्र.क्र.१६७/पापु-१४

जी. टी. रुग्णालय संकुल इमारत, ७ वा मजला,
मंत्रालय, मुंबई ४०० ०३२
तारीख: १९ डिसेंबर, २०१८

वाचा :-

१) शासन निर्णय, पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग, क्रमांक टंचाई ३०९९/प्र.क्र. १३/पापु-१४ दिनांक ०१ फेब्रवारी, १९९९
२) शासन परिपत्रक, पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग, क्रमांक टंचाई १००५/प्र.क्र. ३०५/ पापु-१४, दिनांक २४ जानेवारी, २००६
३) शासन निर्णय, पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग, क्रमांक टंचाई २००८/प्र.क्र.४८/ पापु-१४, दिनांक ११ जून, २००९
४) शासन निर्णय, पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग, क्रमांक टंचाई २०१२/प्र.क्र.५३/ पापु-१४, दिनांक ३० एप्रिल, २०१२
५) शासन परिपत्रक, पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग, क्रमांक टंचाई २०१३/प्र.क्र. ४१८/ पापु-१४, दिनांक ०४ जानेवारी, २०१४

प्रस्तावना :-

पिण्याच्या पाण्याची टंचाई असलेल्या भागात टँकरद्वारे पाणी पुरवठा करण्यात येतो. मात्र टँकर व ट्रक्सद्वारे होणारा पाणी पुरवठा हा अत्यंत खर्चिक असल्याने अत्यावश्यक असलेल्या ठिकाणीच अशाप्रकारे पाणी पुरवठा करण्यात यावा व शक्यतो शासकीय टॅकर्सचा वापर करावा असे आदेश वेळोवेळी निर्गमित करण्यात आले आहेत. तथापि, उन्हाळयात शासकीय टँकर्स अपुरे पडतात त्यावेळी खाजगी टँकर्स भाडयाने घ्यावे लागतात. टँकरचे भाडे टँकर/ट्रक वर बसविलेल्या पाण्याच्या टाकीच्या पाणी वाहून नेण्याच्या क्षमतेनुसार १ मे. टन या एककामध्ये ( Unit) ठरवून त्याप्रमाणात खाजगी टँकर/ ट्रकचे भाडे दिनांक ३० एप्रिल, २०१२ च्या शासन निर्णयान्वये निश्चित करण्यात आली होते. तसेच दुर्गम व अति दुर्गम भागामध्ये अतितीव्र घाट असल्याने त्याठिकाणी मोठे टँकर जाऊ शकत नाहीत अशा

वेळेस ३००० ते ५००० लिटर्सचे छोटे टँकर त्या ठिकाणी पाठवावे लागतात. परंतू शासन मान्य दर छोटया टँकर्सना परवडत नसल्यामुळे सदर टॅकर्सचे दर स्वतंत्रपणे ठरविण्याची बाब व मागील सहा वर्षात डिझेलच्या दरात व अन्य खर्चात झालेली वाढ विचारात घेऊन खाजगी टँकर्स व ट्रक्सच्या दरामध्ये वाढ करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

## शासन निर्णय:-

उपरोक्त सर्व बाबींचा विचार करुन पिण्याच्या पाण्याचा पुरवठा करण्यासाठी भाडयाने घ्यावयाच्या खाजगी टँकर्स व ट्रक्सचे संदर्भ क्रमांक ४ येथील शासन निर्णयान्वये निश्चित केलेले कमाल दर पुढीलप्रमाणे सुधारित करण्यात येत आहेत.

| प्रति मे. टन वहन क्षमता | सध्या मिळत असलेले भाडे (रु.) | सुधारित कमाल प्रतिदिन भाडे ( रु.) | सध्या कमाल प्रति किलोमीटर भाडे (रु.) | सुधारित कमाल प्रति किलोमीटर भाडे (रु.) |
|---|---|---|---|---|
| १ मे. टन | १५८ | २७० | २.०० | ३.४० |

| टँकर /ट्रकवरील टाकींची पाणी वहन करण्याची क्षमता दुर्गम व अतीदुर्गम भागामध्ये अतितीव्र घाट असलेल्या ठिकाणी | सध्या मिळत असलेले कमाल प्रतिदिन भाडे ( रु.) | सुधारित कमाल प्रतिदिन भाड ( रु. ) | सध्या मिळत असलेल्या प्रति. कि. मी. भाडे (रु.) | सुधारित कमाल प्रतिदिन भाडे (रु.) |
|---|---|---|---|---|
| ३००० ते ५००० लिटर्स | १९८ | ३३८ | २.५० | ४.३० |

२. पाणी पुरवठा करण्या-या टँकर/ ट्रकवरील टाकीची पाणी वहन क्षमता आर.टी.ओ. मार्फत प्रमाणित करुन घ्यावी. त्यानुसार टँकर/ट्रकला देण्यात येणारे प्रतिदिन व प्रति कि.मी. भाडे १ मे. टन एककाच्या प्रमाणात देण्यात यावे.

३. पिण्याच्या पाण्याच्या टंचाई निवारणार्थ खाजगी टँकर / ट्रक्सद्वारे करावयाच्या पाणी पुरवठयासाठी, टंचाईच्या तीव्रतेनुसार किती खाजगी टँकर्स / ट्रकची (पाण्याची टाकी बसविलेले) आवश्यकता निर्माण होईल याबाबतचा अंदाज घेऊन, संबंधित ठेकेदाराकडून निविदा मागवाव्यात, यासाठी निविदासूचना राज्य व जिल्हा पातळीवरील अधिक खपाच्या वर्तमानपत्रांमध्ये प्रसिध्द करावी, जेणेकरुन त्यास व्यापक प्रसिध्दी मिळेल. प्राप्त निविदातून कमीतकमी दराची निविदा स्विकारावी.

४. टँकरद्वारे/पिण्याच्या पाणी पुरवठा करण्यासाठीच्या उपाययोजनांकरीता जो निधी वितरीत करण्यात येणार आहे, त्यामधून देयके अदा करताना खाजगी टँकरवर जी.पी.एस. प्रणाली बसविलेली असेल व जी.पी.एस. प्रणालीवर ज्या टँकरच्या फे-यांची नोंद होईल त्याच फेऱ्या देयकाकरिता अनुज्ञेय राहतील. पाणी पुरवठा करणा-या ज्या टँकरवर जी.पी.एस. प्रणाली बसविलेली नाही किंवा

जी.पी.एस. प्रणाली बंद असल्याकारणाने टँकर वाहतूक धारकाने टँकरच्या फे-या झाल्याचा दावा केला असल्यास, अशा फे-या अनुज्ञेय ठरणार नाहीत. तसेच जी.पी.एस. प्रणालीची नोंद होत नाही म्हणून देयके प्रमाणित करण्यात येऊ नये व अशा प्रकारे प्रमाणित केलेल्या देयकांसाठी निधी वितरीत करण्यात येऊ नये.

५. हे आदेश हा शासन निर्णय निर्गमित झाल्याच्या दिनांकापासून अंमलात येतील.

६. हे आदेश वित्त विभागाच्या अनौपचारिक संदर्भ क्रमांक ३०७/२०१८/व्यय-३, दिनांक ०१.११.२०१८ अन्वये प्राप्त झालेल्या सहमतीनुसार निर्गमित करण्यात येत आहेत.

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०१८१२१९१४४०२००६२८ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

Sham Lal Goyal

Digitally signed by Sham Lal Goyal
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Watersupply And Sanitation Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=fef8a156550c1999143688f755340a6b9d3ad380fcde16709e4e63210467e734, serialNumber=19d0cb2b5b2018974e0c848afbd781451d1c4c0d347d2a12395c8dffac4670f9, cn=Sham Lal Goyal
Date: 2018.12.19 15:06:35 +05'30'

( शाम लाल गोयल )
अपर मुख्य सचिव, महाराष्ट्र शासन

प्रत,

१. मा. मंत्री, पाणी पुरवठा व स्वच्छता, मंत्रालय, मुंबई
२. मा. राज्यमंत्री, पाणी पुरवठा व स्वच्छता, मंत्रालय, मुंबई
३. अपर मुख्य सचिव, (मदत व पुनर्वसन) महसूल व वन विभाग, मंत्रालय, मुंबई.
४. प्रधान सचिव, वित्त विभाग, मंत्रालय,मुंबई
५. विभागीय आयुक्त ( सर्व )
६. जिल्हाधिकारी, (सर्व)
७. मुख्य कार्यकारी अधिकारी ,जिल्हा परिषद, (सर्व )
८. अधीक्षक अभियंता, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण (सर्व )
९. कार्यकारी अभियंता, ग्रामीण पाणी पुरवठा विभाग, जिल्हा परिषद, (सर्व )
१०. कार्यकारी अभियंता, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण (सर्व )
११. मुख्य लेखा परिक्षक, स्थानिक निधी लेखा ( सर्व )
१२. जिल्हा स्थानिक निधी लेखा परीक्षक (सर्व )
१३. जिल्हा कोषागार अधिकारी (सर्व )
१४. महालेखापाल, महाराष्ट्र-१,मुंबई (लेखा परीक्षा/लेखा अनुज्ञेयता).

१५. महालेखापाल, महाराष्ट्र-२, नागपूर (लेखा परीक्षा/लेखा अनुज्ञेयता).
१६. उप सचिव, पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग, मंत्रालय.
१७. अवर सचिव पापु-१४, पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग, मंत्रालय.
१८. निवड नस्ती, पापु-१४.